जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 AUG 2025

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात श्री चक्रधर स्वामी जयंती

कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठात चक्रधर स्वामी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. पंकज पवार, डॉ. दिपा इंगवले, डॉ. नईम नदाफ, हर्षद कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 AUG 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये पथनाट्याद्वारे पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जनजागृती केली. (छाया : अर्जुन टाकळकर)

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे पथनाट्यातून जनजागृती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागामार्फत पर्यावरणपूरक गणेशोत्सव या विषयावर विविध ठिकाणी सादरीकरण आणि पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले.

जनजागरण उपक्रम कोल्हापूर शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये उत्साहाने राबविण्यात आला. त्यात कोल्हापूर पब्लिक स्कूल, सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसी, गोखले कॉलेज, विवेकानंद कॉलेज, राष्ट्रसेवा प्रशाला शिरोली या संस्थांचा सहभाग होता. अधिविभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'गेले गणपती कोणीकडे?' हे पथनाट्य विशेष आकर्षण ठरले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी मातीच्या मूर्तींचा वापर, प्लास्टिक सजावट व थर्माकोलचा वापर टाळणे, प्लास्टिकच्या ताट-ग्लासाऐवजी पुन्हा वापरता येणाऱ्या भांड्यांचा वापर करणे, डॉल्बी व लेसर शोमुळे होणारे प्रदूषण टाळणे यासारख्या महत्त्वपूर्ण बाबींविषयी प्रबोधन करण्यात आले. पारंपरिकतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचे मूल्य जपणारा गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सोनल चोंदे व डॉ. पल्लवी भोसले यांनी उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 AUG 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध शाळा, महाविद्यालयांत पथनाट्याद्वारे पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जनजागृती केली.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा जागर

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव' या विषयावर विविध ठिकाणी सादरीकरण आणि पथनाट्यांचे आयोजन केले. कोल्हापूर शहरातील हा जनजागरण उपक्रम विविध शाळा, महाविद्यालयांत उत्साहाने राबविण्यात आला. त्यात कोल्हापूर पब्लिक स्कूल, सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसी, गोखले कॉलेज, विवेकानंद कॉलेज, राष्ट्रसेवा प्रशाला शिरोली या संस्थांचा सहभाग होता. अधिविभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'गेले गणपती कोणीकडे' हे पथनाट्य विशेष आकर्षण ठरले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी मातीच्या मूर्तींचा वापर, प्लास्टिक सजावट, थर्माकोलचा वापर टाळणे, प्लास्टिकच्या ताट-ग्लासाऐवजी पुन्हा वापरता येणाऱ्या भांड्यांचा वापर करणे, लेसर शोमुळे होणारे प्रदूषण टाळणे यांसारख्या बाबींविषयी प्रबोधन केले. पारंपरिकतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचे मूल्य जपणारा गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश दिला. या उपक्रमाचे संयोजन डॉ. आसावरी जाधव, सोनल चोंदे, पल्लवी भोसले यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 AUG 2025
सकाळ

# हिंदी कवयित्री गगन गिल यांची विद्यापीठास सदिच्छा भेट

**कोल्हापूर :** साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त प्रख्यात हिंदी साहित्यिक, कवयित्री गगन गिल यांनी आज शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची भेट घेतली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाकडून प्रकाशित 'ऐसे थे हमारे शाहू महाराज' या पुस्तकाची प्रत देऊन त्यांचे स्वागत केले. हिंदी अधिविभागालाही त्यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी कवयित्री संजीवनी तडेगावकर, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. प्रकाश मुंज, डॉ. विजय चोरमारे, जयसिंग कांबळे, संतोष कोळेकर, गीता दोडमणी, सुषमा चौगुले, प्रकाश निकम उपस्थित होते.

/ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 AUG 2025

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ, शहाजी लॉ कॉलेज यांच्या एकांकिकांची बाजी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे देवल क्लब येथे घेण्यात आलेल्या खुल्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या 'चरचरणाऱ्या फँटसीचे युद्ध' व शहाजी विधी महाविद्यालयाच्या 'कलम ३७५' या एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड झाली.

दोन दिवस झालेल्या प्राथमिक फेरीत १८ संघांनी एकांकिका सादर केल्या होत्या. या स्पर्धेची अंतिम फेरी १५ ते १७ सप्टेंबर या कालावधीत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या मुंबईतील यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुलात होणार आहे.

राज्यभरात १९ केंद्रांवर ही स्पर्धा घेण्यात आली होती. यामध्ये २५२ संघ सहभागी झाले होते, अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली. अंतिम फेरीसाठी पहिले पारितोषिक रोख एक लाख रुपये असून, अंतिम फेरीत पोहोचलेल्या संघांना मार्गदर्शन करण्यासाठी नाट्य परिषदेकडून दिग्दर्शक नेमले जाणार आहेत, अशी माहिती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोल्हापूर शाखेच्या वतीने गिरीश महाजन व आनंद कुलकर्णी यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 AUG 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, शहाजी लॉ कॉलेजच्या एकांकिकांची बाजी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद करंडक २०२५ या खुल्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या कोल्हापुरातील प्राथमिक फेरीतून शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या 'चरचरणाऱ्या फँटसीचे युद्ध' व शहाजी विधी महाविद्यालयाच्या कलम ३७५ या एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड झाली. देवल क्लबच्या सभागृहात दोन दिवस झालेल्या प्राथमिक फेरीत १८ संघांनी एकांकिका सादर केल्या होत्या. या स्पर्धेची अंतिम फेरी १५ ते १७ सप्टेंबर या कालावधीत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या मुंबईतील यशवंतराव चव्हाण नाट्य संकुलात होणार आहे.

नवोदित लेखक दिग्दर्शक तंत्रज्ञ आणि कलावंत यांना त्यांची कला सादर करण्यासाठी संधी उपलब्ध व्हावी, त्यांच्या कलागुणांना वाव

- **अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवड**

मिळावा व व्यावसायिक रंगभूमीस याचा फायदा व्हावा या दृष्टीने अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यभरात १९ केंद्रांवर ही स्पर्धा घेण्यात आली होती. यामध्ये २५२ संघ सहभागी झाले होते, अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली. अंतिम फेरीसाठी पहिले पारितोषिक रोख एक लाख रुपये असून, अंतिम फेरीत पोहोचलेल्या संघांना मार्गदर्शन करण्यासाठी नाट्य परिषदेकडून दिग्दर्शक नेमले जाणार आहेत, अशी माहिती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोल्हापूर शाखेच्या वतीने गिरीश महाजन व आनंद कुलकर्णी यांनी दिली.